# भारतीय स्वातंञ्यलढयातील विदेशी महिलांचे योगदान

**डॉ. मधुकर विठोबा जाधव**
सहयोगी प्राध्यापक,
इतिहास विभाग ,
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय,
हलकर्णी , ता-चंदगड, जि. कोल्हापूर
mvjhistory12@gmail.com

**प्रस्तावना-**

भारतीय राष्ट्रीय चळवळ ही जगाच्या इतिहासातील सर्वात मोठे जन आंदोलन होते. भारतीय स्वातंञ्यलढयात इंग्रज सत्तेविरूध्द लढर्णा यांमध्ये अनेक रणरागिणी होत्या. त्यांचे योगदान सुवर्णाक्षराने नोंद करण्यासारखे आहे. भारतीय स्वातंञ्यलढयात भारतीय स्त्रीयांनी भाग घेतला त्याहीपेक्षा भारत देशाच्या स्वातंञ्यासाठी आहोरात्र कष्टर्णा या परदेशी महिलाही आघाडीवर होत्या. परदेशी असूनही भारतीय स्वातंञ्यसंग्रामध्ये भाग घेऊन श्रेष्ठ कामगिरी करर्णा या लढवय्या स्त्री क्रांतीकारक तितक्याच श्रेष्ठ आहेत. परदेशातील स्त्रीयांचे भारतीय स्वातंञ्यलढयातील योगदान खूप मोठे आहे. भाषा, संस्कृती, देश, धर्म, चालीरीती हे सर्व वेगळे असुन ही त्यांनी भारत मातेच्या स्वातंञ्यासाठी दिलेले योगदान सर्वश्रेष्ठ आहे.

**डॉ. अनी बेझंट-**

डॉ. अनी बेझंट या स्त्री क्रांतीकारक मूळच्या परदेशतील आर्यलंड या देशाच्या रहिवाशी होत. मूळ आर्यलंड देशाच्या असर्णा या डॉ. अनी बेझंट यांचा जन्म १ ऑक्टोंबर १८४७ रोजी झाला. डॉ. अनी बेझंट हया धर्माने ख्रिश्चन होत्या. डॉ. अनी बेझंट व त्यांच्या पतीचे वैचारीक मतभेद झाल्यामूळे त्यांनी आपल्या पतीपासून घटस्पोट घेतला. संसारीक जीवनाचा त्याग करून त्यांनी स्वातंञ्य कार्याला व समाजसेवेला सुरूवात केली. इंग्लंडमध्ये त्यांनी आपल्या कार्यातून समाजसेवेला महत्व प्राप्त करून दिले. प्रारंभी त्यांनी तेथील कामगारांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला.

इ. स. १८९३ साली डॉ. अनी बेझंट भारतात आल्या व त्या भारतीय संस्कृतीशी एकरूप झाल्या. भारतीय संस्कृतीची महानता त्यांना पटली. त्यातून डॉ. अनी बेझंट यांनी भारत भूमीलाच **आपली कर्मभूमी** मानले. भारतीय तत्वज्ञानाचा सखोल अभ्यास केला. डॉ. अनी बेझंट यांनी भारतीय तत्वज्ञान जगात सर्वश्रेष्ठ असल्याचे ठामपणे सांगितले. डॉ. अनी बेझंट यांच्या कार्याला भारताच्या स्वातंञ्यलढयामध्ये महत्वाचे स्थान आहे. भारतीय संस्कृती एवढी महान आहे की भारत देशावरती कोणाचेही पारतंञ्य असू नये भारत देश स्वतंत्र असावा असे त्यांचे ठाम मत होते. डॉ. अनी बेझंट **थिऑसॉफीकल सोसायटीच्या २५** वर्षे अध्यक्ष होत्या. इग्रंजांच्या अन्याय, अत्याचाराला वाचा फोडण्यासाठी व भारताला स्वराज्य मिळावे यासाठी त्यांनी १९१३ साली अखिल भारतीय राष्ट्रीय कॉग्रसचे सभासदत्व स्विकारले. भारतीय पारतंञ्याविरोधी आवाज उठवण्यासाठी व इंग्रंजांचे वर्चस्व नष्ट करण्यासाठी त्यांनी मद्रास प्रांतामध्ये **'कॉमन विल'** हे वृत्तपत्र सुरू केले. एवढेच नव्हेतर भारतीय स्वातंञ्याचा पुरस्कार करण्यासाठी त्या इंग्लंडला गेल्या व तेथे त्यांनी भारतीय स्वातंञ्याचा प्रचार आणि प्रसार केला. इंग्लंडमधुन भारतात परत आल्यानंतर त्यांनी **'न्यू इंडिया'** हे वृत्तपत्र सुरू करून भारतीय स्वातंञ्य लढयाला गती दिली.

डॉ. अनी बेझंट यांनी इंग्रज सत्तेच्या विरोधात संघर्ष करण्यासाठी दि. १ सप्टेंबर १९१६ साली **ऑल इंडिया होमरूल लीगची स्थापना** केली. होमरूल लीगच्या माध्यमातून भारत देशाला स्वातंञ्य मिळवूण देण्यासाठी त्यांनी खूप कष्ट घेतले. होमरूल लीग या संघटनेचा मुख्य उद्देश स्वराज्य मिळविणे हा होता. स्वशासन प्राप्त करण्यासाठी होमरूल चळवळीनी खूप मोठी आंदोलने केली. डॉ. अनी बेझंट यांनी स्थापन केलेल्या होमरूल लीगचा मुख्य उद्देश स्वराज्य मिळविणे हाच

होता.होमरूल लीगच्या प्रसार व प्रचारासाठी संपूर्ण भारतभर त्यांनी दौरे केले.संपूर्ण भारतभर होमरूल लीगच्या शाखा स्थापन केल्या.डॉ.अनी बेझंट यांनी स्वत: भारतभर दौरे करून आपल्या तूफानी व ओजस्वी भाषणानी भारतीयांची मने जिंकली.भारतीयांमध्ये स्वातंत्र्याविषयी जागृती निर्माण केली.भारतीयांच्या मनामध्ये स्वातंत्र्याची ज्योत पेटविली.संपूर्ण भारत देशामध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.होमरूल लीग संदर्भात **पंडित जवाहरलाल नेहरू** म्हणतात "होमरूल आंदोलनामुळे संपूर्ण देशातील तरूण युवकांमध्ये विजेच्या वेगाने उत्साह व स्फूर्ती निर्माण झाली.मी इच्छा अशी व्यक्त करतो की या ऊर्जेचा परिणाम भविष्यात चांगला होवो".

होमरूल लीगच्या आंदोलनाचा भारतीय जनतेच्या मनावर मोठा परिणाम घडून आला.सर्वच स्तरातून होमरूल लीगला पाठिंबा मिळू लागला.त्यामुळे इंग्रजांनी हे आंदोलन चिरडून टाकण्याचा प्रयत्न केला.आंदोलकांची इंग्रजांनी धरपकड करण्यास सुरूवात केली.डॉ.अनी बेझंट व त्यांच्या सहका-यांना पकडून जेलमध्ये टाकण्यात आले.इंग्रज सरकारच्या या धोरणाला संपूर्ण भारत देशातून विरोध झाला.तरूण युवकांमध्ये सरकारविरोधी असंतोष निर्माण झाला.भारतातील संपूर्ण जनता व आखिल भारतीय कॉंग्रेस आणि युवक वर्ग डॉ.अनी बेझंट यांच्या बाजूने उभा राहिला. डॉ.अनी बेझंट व त्यांच्या सहर्का यांची तावडतोब जेलमधून सुटका करावी असे जाहीर केले.डॉ.अनी बेझंट यांनी सूरू केलेल्या होमरूल लीगच्या आंदोलना मुळे संपूर्ण भारतभर तरूणांच्यामध्ये जोश व उत्साह निर्माण झाला.

अमेरिका, इंग्लंड या देशामध्ये ही डॉ.अनी बेझंट यांनी सुरू केलेल्या होमरूल लीगच्या आंदोलनाचे पडसाद उमटले.**न्यूयार्क, सन फ्रान्सिस्को** या ठिकाणी होमरूल लीगची स्थापना करून तेथे **'यंग इडिया'** हे वृत्तपत्र सुरू केले.तेथे या वृत्तपत्राने महत्वपुर्ण कार्य केले.डॉ.अनी बेझंट यांनी इंग्लंडबरोबर पत्रव्यवहार करून भारताला स्वातंत्र्य देणे किती गरजेचे आहे हे सांगितले.इंग्लंडमधील उदारमतवादी जनतेने डॉ.अनी बेझंट यांच्या या स्वातंत्र्यलढयाला पाठिंबा दिला. ॲनी बेझंट सरोजिनी नायडू आणि महात्मा गांधींजी यांच्या संपर्कात आल्यानंतर त्या महात्मा गांधींजी आणि अखिल भारतीय कॉंग्रेसच्या समर्थक झाल्या.डॉ.अनी बेझंट यांच्या कार्याची दखल घेऊन इ.स.१९१७ ला आखिल भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे अध्यक्षपद त्यांना देण्यात आले.मद्रास प्रांतातील होमरूल लीगचे अध्यक्ष सर सुब्रम्हण्यम अय्यर यांनी इ.स.१९१७ साली अमेरिकेचे अध्यक्ष विड्रो विल्सन यांना पत्र लिहून स्वातंत्र्यलढयाला सहकार्य करण्याची विनंती केली.सर सुब्रम्हण्यम अय्यर यांनी त्या पत्रात म्हटले होते."आम्ही आज गुलामगिरीत आहोत.तुम्ही आम्हाला स्वराज्याचे आश्वासन दिल्यास आमच्या देशातील लाखो सैनिक युध्द आघाडीवर पाठविले जातील".सर सुब्रम्हण्यम अय्यर यांनी पाठविलेल्या या पत्राला इंग्लंड, अमेरिकेमध्ये फार प्रसिध्दी मिळाली.होमरूल लीगच्या आंदोलनातून भारत स्वातंत्र्याच्या दिशेने धाऊ लागला.अशा महान नेत्या डॉ.अनी बेझंट यांचा दि.२३ ऑक्टोंबर १९३३ साली भारत भूमीमध्येच मृत्यु झाला.

**मार्गरेट नोबेल□भगिनी निवेदिता:**

भगिनी निवेदिता यांचे मुळ नाव मर्गारेट एलिझाबेथ नोबल असे होते.ही आर्यलॉडची कन्या होय.२८ ऑक्टोंबर १८६७ रोजी त्यांचा जन्म झाला.अनेक ठिकाणी त्यांनी मुलींच्या शाळेमध्ये शिक्षीकेचे कार्य केले.स्वामी विवेकानंद यांनी शिकागो येथे आंतरराष्ट्रीय सर्वधर्म परिषदेत हिंदू धर्मावर जे महत्वपूर्ण भाषण केले.यातुन त्यांना भारत देशाची महानता पटली व त्यांनी विवेकानंदांचे शिष्यत्व पत्करले.त्यांनी १८९८ मध्ये भारतात कायमचे वास्तव्य करण्याचा निर्णय घेतला.भारतीय राष्ट्रीय चळवळीमध्ये त्या सक्रिय झाल्या.या स्वातंत्र्यलढयात त्यांचे योगदान प्रभावी होते.त्यांनी गुप्त क्रांतीकारी गटात व स्वदेशी चळवळीत सहभाग घेतला.भारत हा एक गतिमान देश आहे.यावर त्यांची नितांत श्रध्दा होती.एक बलवान व शक्तिमान राष्ट्र म्हणुन भारताचा उदय व्हावा यासाठी त्या कायम पयत्नशील राहिल्या.रामकृष्ण परमहंस यांच्या पत्नी शारदामातेने तिला आपली मुलगी मानले व निवेदिता असे तिचे नामकरण केले.भगिनी निवेदिता म्हणून ती भारतीय समाजात मिसळून गेली.भगिनी निवेदिता हिने सुरू केलेल्या शाळेत स्वदेशी व स्वातंत्र्याचे धडे दिले जात असत.वन्दे मातरम हे राष्ट्रगीत त्या शाळेत प्रार्थना म्हणून गायले जात असे.भारतीय स्वातंत्र्यासाठी त्यांनी देशभर भ्रमंती केली.१९०५ च्या बंगालच्या फाळणी वेळी ती भारतीय जनतेच्या बाजूने उभी होती.क्रांतीकारक अरविंद घोष यांना इंग्रजांपासुन धोका आहे.हे ओळखून त्यांनी पॉण्डेचरी या फ्रेंचांच्या राजवटीत सुखरूपणे पोहोचविले.त्यांनी मास्टर एज आई सा हिम, ए-पिलग्रिम्स डायरी, काली द मदर, केदारनाथ एण्ड बदरीनारायण असे महत्वपूर्ण लिखान केले.१३ ऑक्टोंबर १९११ रोजी दार्जिलिंग येथे त्यांचा मृत्यु झाला.हिंदू संस्कारानुसार त्यांच्यावर आंतिम संस्कार करण्यात आले.दार्जिलिग येथे

त्यांच्या शौर्याची गाथा सांगणारे स्मारक उभारण्यात आले आहे. 'Here reposes sister Nivedita who gave her all to India' असे त्यांच्या समाधी स्मारकावर लिहिण्यात आलेले आहे.

**नेली**:

नेली ही इंग्लंडची कन्या होय. केंब्रिज येथे शिक्षण घेत असताना १९१0 मध्ये जितेंद्र मोहन सेनगुप्ता या देशाभिमानी बंगाली भारतीय तरूणाशी विवाह करून ती भारतात आली. भारतीय स्वातंत्र्यलढयातील महात्मा गांधी व सरोजिनी नायडू यांच्या कार्यामुळे ती प्रभावित झाली. जितेंद्र सेनगुप्ताच्या सहकार्याने तिने भारतीय स्वातंत्र्यलढयात उढी घेतली. असहकार आंदोलनात भाग घेतल्यामुळे तिला सहा महिन्याची शिक्षा झाली. सविनय कायदेभग चळवळीत भाग घेतल्यामुळे तिला चार महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा झाली. तिच्या कामाची पोच पावती म्हणून १९३३ मध्ये तिची अखिल भारतीय कॉग्रेसच्या अध्यक्षपदावर निवड झाली. अध्यक्षीय भाषण सुरू होण्यापूर्वीच तिला अटक झाली. १९३६ व १९४0 साली कलकत्ता महापालिकेवर तिची निवड झाली. १९४६ साली बंगालच्या विधिमंडळावर ती निवडून आली. आयुष्यभर तिने भारत भूमीची सेवा केली. शेवटी भारताच्याच भूमीमध्ये २३ ऑक्टोंबर १९७३ रोजी तिची प्राणज्योत मालवली.

**मीरा बेनः**

ही ब्रिटिश कन्या होय. तीचे मुळ नाव **मेडेलीन स्लेड** होय. ब्रिटिश नाविक दलातील अधिकारी **ॲडमिरल स्लेड** यांची ही मुलगी होय. १९२५ मध्ये ती भारतात आली. साबरमती आश्रमात ती महात्मा गांधींजीना भेटली. महात्मा गांधींजीनी तीला आपली मुलगी मानले. मीरा या नावाने ती ओळखली गेली. भारतीय स्वातंत्र्य लढयाच्या इतिहास ती मीराबेन म्हणून कार्यरत राहिली. महात्मा गांधीजींच्या बरोबर पहिल्या गोलमेज परिषदेकरीता ती इंग्लंडला गेली. भारतातील सत्यपरिस्थितीचे कथन करणारी पत्रके तयार करून तिने ती जगभर पाठविली. भारतातील स्वातंत्र्यलढयाची माहिती त्यातुन प्रसिध्द केली. तिच्या या कामामुळे तिला तीन महिन्यांची शिक्षा झाली. मुंबईला परत आल्यानंतर त्याच गुन्हयाखाली आणखी एक वर्षाची शिक्षा झाली. त्यांनी महात्मा गांधीजी व भारतीय स्वातंत्र्य चळवळीबद्दलचे गैरसमज दूर करण्यासाठी इंग्लंड व अमेरिकेचे दौरे केले. अमेरिकन विद्यापीठामध्ये त्यांची भाषणे झाली. रेडिओवरूनही त्याचे प्रसारण करण्यात आले. महात्मा गांधींजीच्या हत्येनंतर त्या **खादीचा प्रसार, अस्पृश्यता निवारण, ग्रामविकास** या कामामध्ये व्यस्त राहिल्या. **लेह, मालदासपूर, ऋषिकेश, भिल्लंगा** येथे साबरमती आश्रमाच्या धरतीवर आश्रम स्थापन करण्यात आली. **'बापूराय'** ही पत्रिका सुरू करून त्यांनी महात्मा गांधीजींच्या विचारांचा प्रसार केला. ही पत्रिका जवळ-जवळ पाच भाषेत प्रसिध्द होई. १९५७ मध्ये त्यांनी जगाचा निरोप घेतला.

**मार्गरिट कझिन्सः**

मार्गरिट कुझीन या आयरिश महिला संगीत शिक्षिका होत्या. या विदेशी स्त्रीने भारतीय स्त्रियांना एका व्यासपीठावर आणून या देशात स्त्री मताधिकार मिळवून देण्यासाठी अहोरात्र कष्ट घेतले.

मार्गरिट सेंगर, वेल्दी फिशर, म्युरियल लेस्टर, मीरा रिशार, इडा स्कडर, मॅडम सोफिया अशा अनेक विदेशी स्त्रीयांनी भारताच्या स्वातंत्र्यासाठी योगदान दिले.

**सारांश-**

भारतीय स्वातज्यसंग्रामध्ये विदेशी स्त्री क्रांतीकारकांनी महत्वपुर्ण योगदान दिले. या परदेशी स्त्री क्रांतीविरांगनांनी भारत देशाला आपलेच मानले. त्यांनी भारत देशासाठी सर्वस्व आर्पण केले. भारतीय स्वातंत्र्यासाठी त्या आयुष्यभर कष्टल्या. या सर्व विदेशी स्त्रीयांचे कर्तृत्व फार मोठे आहे. या परदेशी क्रांतीवीरांगनांनी स्वराज्य मिळविण्यासाठी भारतीय स्वातंत्र्यलढयामध्ये नवचैतन्य आणले. भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासामध्ये स्त्री क्रांतीकारकांच्या शोर्याला व त्यागाला वरचे स्थान प्राप्त करून देण्याचे कार्य या विदेशी स्त्री क्रांतीकारकांनी केले. भारतीय स्वातंत्र्यलढयातील स्त्री क्रांतीकारक म्हणून त्यांना श्रेष्ठ स्थान आहे. भारत देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी त्यांनी खूप कष्ट घेतले. स्वातंत्र्याचा अमृतमोहात्सव साजरा करीत असताना विदेशी क्रांतीवीरांगनांचे स्मरण करणे क्रमप्राप्त आहे.

**संदर्भ ग्रंथ-**


१. गोस्वामी सुधा, भारतवर्ष की चर्चित महिलाएँ, उपकार प्रकाशन, आगरा-२.

२. मोदी नवाझ (संपा), वासंती फडके (अनुवादक), भारतीय स्वातंत्र्यलढयातील स्त्रिया, मेहता प्रकाशन पुणे, २००४.

३. पांडे प्रमोद, स्वातंत्र्य संग्रामातील समिधा, पुणे, १९९८.

४. सरकार सुमित, आधुनिक भारत, दिल्ली, १९९९.

५. देसाई नयनतारा, रणरागिणी, पुणे, २००९.

६. देशपांडे सुषमा, भारतीय इतिहासातील स्त्री आणि कर्तुत्व, औरंगाबाद, २०१९.

७. आचार्य धनंजय, भारतीय क्रांतीयुध्द, नागपूर, २००९.

८. गाठाळ एस.एस, भारतीय राष्ट्रीय चळवळीचा इतिहास, औरंगाबाद, २०११.

९. धर्माधिकारी तारा, स्वातंत्र्य लढयातील स्त्री, मुंबई, २००१.

१०. वाजपेयी लक्ष्मी शंकर (संपा), साहित्य अमृत, नई दिल्ली, २०२२.

११. खापेकर विनाय, स्त्री स्वातंत्र्यवादिनी विसाव्या शतकातील परिवर्तन, मुंबई, १९९१.

१२. झोड अनिल, भारतीय स्वातंत्र्यलढयातील महिलांचे योगदान, नागपूर, २००३.